ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 8 | September - 2016

Indian Streams Research Journal

# नागपूर जिल्हयातील त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्था व स्थानिक स्वराज्य संस्था मधील महिला पदाधिकाऱ्यांच्या भूमिकेचा अभ्यास: एक अध्ययन

डॉ. रेखा मि. गुल्हाने
संशोधनकर्ती , श्रीनिकेतन कला वाणिज्य महाविद्यालय, नागपूर.

## सारांश

प्रस्तुत संशोधनात नागपूर जिल्ह्यातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिला पदाधिकाऱ्यांकडुन संकलीत करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले. संकलीत तथ्यांच्या विश्लेषणाकरीता विविध सांख्यिकीय पद्धतींचा वापर करण्यात आला. यात प्रामुख्याने वारंवारीता व टक्केवारी तसेच विविध पर्यायांदरम्यान सार्थकता स्तर तपासण्याकरीता *Non-Parametric Chi square test* व सहसंबंध विश्लेषणा करिता पियरसन सहसंबंध चाचणी *(Pearson Correlation Test)* या सांख्यिकीय चाचणीचा वापर करण्यात आला. विश्लेषित माहिती सारण्यांच्या स्वरूपात प्रस्तुत करण्यात आली व यावरून आलेख तयार करण्यात आले आहे.

## प्रस्तावना

महाराष्ट्रातील नागपूर जिल्ह्यात अनेक समस्या असून महिला विकासाची समस्या गंभीर बनली आहे. प्रत्यक्षात नागपूर जिल्ह्यात



अंधश्रद्धा, निरक्षरता, आरोग्य, शिक्षण, राहाणीमान, रोजगार व आर्थिक मागासलेपण इत्यादी गंभीर प्रश्न आहेत. या जिल्ह्याकरिता विविध विकास योजना राबविण्यात आल्या असल्या तरी जिल्ह्याचा पाहिजे तितका विकास व सुधारणा झालेली नसल्याचेच प्रथमदृष्ट्या निदर्शनास येते.

७३ व्या घटना दुरूस्ती नंतर भारतातील प्रत्येक राज्यात त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्था लागु करण्यात आली पंचायत समिती व स्थानिक स्वराज्य संस्थांना मोठया प्रमाणात निर्णय अधिकार व हक्क देण्यात आले व याच्या अंमलबजावणीचे अधिकार देखील पंचायतराज व स्थानिक स्वराज्य संस्था पदाधिकाऱ्यांच्या सुपूर्द करण्यात आले. असे असून देखील देशातील बहुतांश क्षेत्रात सुधरणा झाल्याचे दिसून येत नाही.

याच अनुशंगाने सदर संशोधनात पंचायतराज व स्थानिक स्वराज्य संस्था मधील महिला पदाधिकाऱ्यांच्या भूमिकेचा अभ्यास करण्यात आला आहे. सदर संशोधना अंतर्गत पंचायतराज व स्थानिक स्वराज्य संस्था मधील महिला पदाधिकाऱ्यांच्या पंचायतराज संस्थेसंदर्भातील जाणिवजागृतीचा आढावा घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे त्यांचा पंचायतराज संस्थेच्या कार्यात सहभाग, सामाजिक विकासात सहभाग व त्याचे परिणाम याचे देखिल विवेचन करण्यात आले आहे. तसेच पंचायतराज संस्थेअंतर्गत विविध विकास योजना राबवितांना त्यांना येणाऱ्या सामाजिक, आर्थिक, प्रशासनिक, राजकीय व कौटुंबिक समस्यांचा देखील शोध घेण्यात आला. पंचायतराज व स्थानिक स्वराज्य संस्थांमधे महिला आरक्षणामुळे महिला प्रतिनिधींची संख्या व सहभागावर काही परिणाम झाला आहे किंवा नाही याचा आढावा देखील या संशोधनात घेण्यात आला आहे. या अनुशंगाने सदर संशोधन हे महत्वपूर्ण आहे. या संशोधनातून प्राप्त निष्कर्ष व शिफारशी या नागपूर जिल्ह्यातील पंचायतराज व स्थानिक स्वराज्य संस्था मधील महिला पदाधिकारी व प्रतीनिधींकरिता तसेच शासन व योजनाकारांना उपयोगी ठरतील.

**सारणी क्रमांक १: पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिला पदाधिकाऱ्याचे त्यांच्या शैक्षणिक स्थितीनूसार वर्गीकरण**

| शिक्षण | वरंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| निरक्षर | ०१ | ०.६ |
| प्राथमिक | ११ | ७.० |
| माध्यमिक | ६० | ३६.१ |
| उच्च माध्यमिक | ६६ | ४०.३ |
| स्नातक | १९ | ११.२ |
| स्नाकोत्तर | ०५ | ३.० |
| इतर | ०३ | १.८ |
| **एकूण** | **१६५** | **१००** |
| Chi-Square | Df | Sig |
| ७०५.५५९ | ६ | <०.०५ |

उपरोक्त सारणी क्रमांक १ मध्ये नागपूर जिल्ह्यातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिला पदाधिकाऱ्यांचे त्यांच्या शैक्षणिक स्थितीनूसार वर्गीकरण दर्शविण्यात आले आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ०.६ टक्के महिला पदाधिकारी निरक्षर असून ७.० टक्के महिला पदाधिकाऱ्यांने प्राथमिक स्तरापर्यंत शिक्षण प्राप्त केले होते. तसेच ३६.१ टक्के, ४०.३ टक्के व ११.२ टक्के अनुक्रमे महिला पदाधिकाऱ्यांनी माध्यमिक, उच्च माध्यमिक व स्नातक स्तरापर्यंत शिक्षण प्राप्त केले होते. त्याचप्रमाणे ३.० टक्के महिला अधिकाऱ्यांनी स्नातकोत्तर स्तरापर्यंत शिक्षण प्राप्त केले असून १.८ टक्के महिला पदाधिकाऱ्यांनी इतर स्तरापर्यंत शिक्षण प्राप्त केले होते.

काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, शैक्षणिक स्थितीनूसार नागपूर जिल्ह्यातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिला पदाधिकाऱ्यांदरम्यान सार्थक ($P<0.05$) फरक आहे. म्हणजेच नागपूर जिल्ह्यातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिला पदाधिकाऱ्यांमध्ये उच्च माध्यमिक स्तरापर्यंत शिकलेल्या पदाधिकाऱ्यांची संख्या इतर पदाधिकाऱ्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

**सारणी क्रमांक २: पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिला पदाधिकाऱ्यांच्या गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थेतील सदस्यतेसंबंधी माहिती**

| गावात/शहरात उपलब्ध सामाजिक संस्थेचे सदस्यत्व | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ५४ | ३२.७ |
| नाही | १११ | ६७.३ |
| **एकूण** | **१६५** | **१००** |
| Chi-Square | Df | Sig |
| ७०.७२७ | १ | <०.०५ |

उपरोक्त सारणी क्रमांक २ मध्ये नागपूर जिल्ह्यातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिला पदाधिकाऱ्यांच्या गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थेतील सदस्यतेसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ३२.८ टक्के महिला पदाधिकारी त्यांच्या गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थेत सदस्य होते. तसेच ६७.२ टक्के महिला पदाधिकाऱ्यांची त्यांच्या गावात अथवा शहरातील सामाजिक संस्थेत सदस्यता नव्हती.

काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थेतील सदस्यतेनूसार नागपूर जिल्ह्यातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिला पदाधिकाऱ्यांदरम्यान सार्थक ($P<0.05$) फरक आहे. म्हणजेच नागपूर जिल्ह्यातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिला

पदाधिकाऱ्यांमध्ये गावात अथवा शहरातील सामाजिक संस्थेत सदस्य नसणाऱ्या पदाधिकाऱ्यांची संख्या इतर पदाधिकाऱ्यांच्या तुलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

**सारणी क्रमांक ३: पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिला पदाधिकाऱ्यांद्वारे गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यासंबंधी माहिती**

| **या संस्थांच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| अंशत: | ९८ | ५९.४ |
| पुर्णत: | ५४ | ३२.७ |
| मुळीच नाही | १३ | ७.९ |
| **एकूण** | **१६५** | **१००.०** |
| Chi-Square | Df | Sig |
| २३८.७७ | २ | <0.05 |

उपरोक्त सारणी क्रमांक ३ मध्ये नागपूर जिल्ह्यातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिला पदाधिकाऱ्यांद्वारे गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ५९.४ टक्के महिला पदाधिकाऱ्यांद्वारे गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी अंशत: प्रयत्न केले जाते तर ३२.७ टक्के महिला पदाधिकाऱ्यांद्वारे गावात अथवा शहरातील सामाजिक समस्या सोडविण्यासाठी पुर्णत: प्रयत्न करण्यात येते. तसेच ७.९ टक्के महिला पदाधिकाऱ्यांद्वारे गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत नाही.

काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, गावात अथवा शहरात उपलब्ध संस्थांच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यानूसार नागपूर जिल्ह्यातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिला पदाधिकाऱ्यां दरम्यान सार्थक ($P<0.05$) फरक आहे. म्हणजेच नागपूर जिल्ह्यातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिला पदाधिकाऱ्यांमध्ये संस्थांच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या महिला पदाधिकाऱ्यांची संख्या इतर पदाधिकाऱ्यांच्या तुलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

**सारणी क्रमांक ४: सामाजिक विकासात असलेल्या स्वत:च्या सहभागाच्या प्रमाणासंबंधी पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिला पदाधिकाऱ्यांची प्रतिक्रीया**

| **सामाजिक विकासात असलेल्या सहभागाचे प्रमाण** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| अंशत: | ९३ | ५६.७ |
| पुर्णत: | ७२ | ४३.३ |
| लागू होत नाही | – | – |
| **एकूण** | **१६५** | **१००** |
| Chi-Square | Df | Sig |
| ३१६.८१ | २ | <0.05 |

उपरोक्त सारणी क्रमांक ४ मध्ये पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिला पदाधिकाऱ्यांची सामाजिक विकासात असलेल्या स्वत:च्या सहभागाच्या प्रमाणासंबंधी प्रतिक्रीया दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ५६.७ टक्के महिला पदाधिकाऱ्यांच्या मते त्यांचा सामाजिक विकासात अंशत: सहभाग होता. तसेच ४३.३ टक्के महिला पदाधिकाऱ्यांच्या मते त्यांचा गावातील सामाजिक विकासात पुर्णत: सहभाग होता.

काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, सामाजिक विकासात असलेल्या सहभागानूसार नागपूर जिल्ह्यातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिला पदाधिकाऱ्यांदरम्यान सार्थक ($P<0.05$) फरक आहे. म्हणजेच नागपूर जिल्ह्यातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिला पदाधिकाऱ्यांमध्ये गावातील सामाजिक विकासात अंशतः सहभाग असणाऱ्या पदाधिकाऱ्यांची संख्या इतर पदाधिकाऱ्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

## निष्कर्ष

अध्ययनातील परीणामांवरून (सारणी क्रमांक १) असे निदर्शनास येते की, नागपूर जिल्ह्यातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिला पदाधिकाऱ्यांमध्ये उच्च माध्यमिक स्तरापर्यंत शिकलेल्या पदाधिकाऱ्यांची संख्या महत्वपुर्णपणे अधिक आहे व ८४.० टक्के महिला पदाधिकाऱ्यांचे शैक्षणीक स्तर स्नातक स्तरापेक्षा कमी आहे. तसेच केवळ ३२.७ टक्के महिला पदाधिकारी त्यांच्या गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थेत सदस्य आहेत (सारणी क्रमांक २). ५९.४ टक्के महिला पदाधिकाऱ्यांद्वारे गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी अंशतः प्रयत्न केले जाते (सारणी क्रमांक ३). ५६.७ टक्के महिला पदाधिकाऱ्यांच्या मते त्यांचा सामाजिक विकासात अंशतः सहभाग होता (सारणी क्रमांक ४). या वरून असे स्पष्ट होते की नागपूर जिल्ह्यातील पंचायतराज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिला पदाधिकाऱ्यांचा सामाजिक कार्यात सहभाग अल्प प्रमाणात आहे व महत्वपूर्णपणे अधिक पदाधिकाऱ्यांचे शिक्षण स्नातक स्तरापेक्षा कमी आहे. यावरून नागपूर जिल्ह्यातील पंचायतराज व स्थानिक स्वराज्य संस्थांमधिल महिला पदाधिकाऱ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावला नसल्यामुळे त्यांचा सामाजिक कार्यात सहभाग अल्प प्रमाणात असल्याचे निदर्शनास येते.

## संदर्भग्रंथ सूची


१) अग्रवाल., प्र. (२००८), भारत में पंचायतराज, ज्ञानगंगा प्रकाशन, दिल्ली

२) अमृतकर., प्र. (२००१), 'चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर जिल्ह परिषद तसेच चंद्रपूर, वरोडा व राजूरा पंचायत समित्या अंतर्गत पंचायत राज संस्थामधील सदस्य व पदाधिकारी स्त्रियांचा सहभाग व भूमिकेबाबत अध्ययन' पी एच. डी. प्रबंध, नागपूर विद्यापीठ.

३) कश्यप., अ. (२०१०), भारत में पंचायतीराज, डिस्कवरी पब्लिशिंग हाऊस प्राईवेट लिमिटेड, नई दिल्ली.

४) कऱ्हाळे, वि., (२०११), नांदेड लिल्हा परिषदेतील आदिवासी नेतृत्वांचा अभ्यास, शोध प्रबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड,

५) शर्मा., म. आणि शुक्ला, र. (२०११), 'पंचायतराज व्यवस्था नवीन ग्रामीण नेतृत्व का अविर्भाव', संपादक पी. पी. गौर, आर. के. मराठा अर्जुन पब्लिशिंग हाऊस, दिल्ली, २०११, पृ. क्र. ५८ ते ६७.

६) कुलकर्णी., ए.एम. (२००१), भारतातील स्थानिक शासन, मधुरा प्रकाशन, सांगली.

७) भोगे., कृ. (२०१५), महानगरपालिका प्रशासन, सकाळ करिअर मंत्र, दैनिक सकाळ, औरंगाबाद.

८) कौटिल्यीय अर्थशास्त्रम, चौखम्बा विद्या भवन, वाराणसी प्रथम अध्याय १७ वॉ प्रकरण.

९) क्रोस., से. (१९२२), द डवेलपमंट ऑफ सेल्फ गवर्नमेंट इन इंडिया, शिकागो युनिवर्सिटी प्रेस शिकागो

१०) कोतवाल आणि लेले (२००२), प्रतिनिधित्व राखीव जागा आणि स्त्रिया, प्रकाशबाळ, किशोर बेडकिहाड (संपा.) भारतीय राजकीय व्यवस्था प्रक्रीया आणि स्वरूप, आंबेडकर अकादमी सातारा, पृ. क्र. २०९

११) कुळकर्णी आणि श्रीनिवास (२००८), पंचायतराजची पंधरा वर्ष अवकाश कमी अडथळे जास्त, परिवर्तनाचा वाटसरू, पृ १०-१३.

१२) कोलते., पु.ये., (२००६), 'औरंगाबाद जिल्ह्यातील पंचायत राजव्यवस्थेत महिलांचा सहभाग' (१९९१ ते २००१) पीएच्.डी. शोधप्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.